**प्रतिवादीतर्फे सा.क्र. १ चा सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ढोकणे यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ८३ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

२. मी शपथपत्रासह खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

1) मुखत्यारपत्र **नि.क्र. ८४**
2) गट क्र. १०९/१अ च्या ७/१२ ची ऑनलाईन प्रत **नि.क्र. ८५**
3) गट क्र. १०९/१ब च्या ७/१२ ची ऑनलाईन प्रत **नि.क्र. ८६**
4) गट क्र. १०९/२/१ च्या ७/१२ ची ऑनलाईन प्रत **नि.क्र. ८७**
5) गट क्र. १०९/२/२ च्या ७/१२ ची ऑनलाईन प्रत **नि.क्र. ८८**
6) गट क्र. १०९/२/३ च्या ७/१२ ची ऑनलाईन प्रत **नि.क्र. ८९**
7) मालमत्ता क्र. २४२ चा नमुना ८अ चा उतारा **नि.क्र. ९०**

सरतपास पुर्ण.

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. बी. देशमुख यांच्यामार्फत:-**

३. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ६अ ते ६ओ यापैकी कुणीही वयस्कर नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १०९ मध्ये सामुदायीक वस्ती व विहीर असल्याचे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रात प्रतिवादी क्र. ६ ने त्यांच्या हिश्याचे १० आर क्षेत्र वादग्रस्त मिळकतीत सोडून दिल्याचे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे वडील व प्रतिवादी क्र. ६ यांच्यात असलेला ३०-४० वर्षापुर्वीचा पुर्व-पश्चिम बांध आजरोजी कायम असल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीच्या मोजणीच्या वेळेस मी हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याच्या वेळेस मी हजर होतो व त्यावेळेस मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीदाराने आम्हाला मोजणीची नोटीस पाठवली नाही व मला त्याबाबत माहिती असल्याचे खोटे नमुद केले आहे. मला माझ्या गटाचे

क्षेत्रफळ सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीदाराने आमच्याकडे वादीचे १० गुंठे क्षेत्र कमी दाखवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे माझ्याकडे निघालेले १० आर अतिक्रमित क्षेत्र द्यावे लागू नये म्हणून मी खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही. श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR
Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.03.09 16:42:00 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-०९/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

ता. राहुरी, जि. अहमदनगर.